स्थानिक स्वराज्य संस्थांच्या
सार्वत्रिक निवडणूका२०२५-
कायदा व सुव्यवस्थेबाबत एकत्रित आदेश

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक- रानिआ/जिपपंस-२०२५/प्र.क्र.४१/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई:-४०० ०३२.
दि. ०४ नोव्हेंबर, २०२५.
ई मेल - sec.zpps@mah.gov.in

संदर्भ :- १. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मनपा-२०२५/ प्र.क्र.६/का.५ दि. १६ जुलै, २०२५.
२. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/जिपपंस -२०२५/ प्र.क्र.४२/का.७ दि. ०४ नोव्हेंबर,२०२५.(आचारसंहितेचे आदेश)
३. राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/ प्र.क्र.५/का.१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५.

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया शांत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणमध्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन आदेशान्वये खालील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर आदेश दिलेले आहेत.:-

i. निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे.

ii. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस व इतर विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

iii. आचारसंहितेच्या अनुषंगाने एकत्रित आदेश -२०२५.

iv. प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५.

ज्याअर्थी, उपरोक्त आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील निवडणूक यंत्रणेबरोबर पोलीस यंत्रणेचा देखील नि:पक्षपाती सहभाग असणे आवश्यक असून, त्याअनुषंगाने एकत्रित आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखून आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४(४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ, पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांदरम्यान राज्यातील निवडणुकांची प्रक्रीया शांत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने राज्याच्या पोलीस महासंचालकांनी सर्व संबंधित पोलीस आयुक्त (CP) व पोलीस अधिक्षक (SP) यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या अनुषंगाने योग्य ते निर्देश द्यावेत.

महानगरपालिका क्षेत्रात संबंधित महानगरपालिका आयुक्त यांनी संबंधित जिल्हाधिकारी तसेच पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी समन्वय साधून; तर अन्य निवडणुकांबाबत संबंधित

जिल्हाधिकारी यांनी यथास्थिती संबंधित पोलीस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्यासोबत समन्वय साधून निवडणुकांदरम्यान कायदा व सुव्यवस्था राखून आचारसंहितेची अंमलबजावणी करण्याकरीता कोणत्या उपाययोजना करणे आवश्यक आहे याचा शास्त्रोक्त अभ्यास करुन एक कृती आराखडा तयार करावा. या आराखड्यामध्ये खालील बाबींचा समावेश असावा.

(i) कायदा व सुव्यवस्था राखणे -प्रतिबंधात्मक उपाययोजनांसह (संवेदनशील, नक्षलग्रस्त, इत्यादी भागांसाठी विशेष व्यवस्था)

(ii) आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे

(iii) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरिता देण्यात येणाऱ्या वस्तू, मद्य (Liquor), पैसा इत्यादींच्या वाटपावर अंकुश ठेवणे.

(iv) रोख रकमांच्या ने-आण संदर्भात लक्ष ठेवणे. त्यासाठी सर्व महत्त्वाच्या ठिकाणी उदा. विमानतळ, रेल्वे स्थानक, हॉटेल्स, फार्म हाऊस यांच्यावर नजर ठेवणे.

(v) असे व्यवहार करणाऱ्याच्या हालचालीवर जसे तारण, वित्तीय हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) लक्ष ठेवणे.

(vi) बँकांमार्फत, पतसंस्थेमार्फत होणाऱ्या मोठ्या व संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे.

(vi) आयोगाचे आदेश क्र. रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का.१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५ प्रमाणे पेड न्यूज, सोशल कमेंट, सोशल मीडिया व इंटरनेट इत्यादींवर लक्ष ठेवणे.

१. **निवडणूक कार्यक्षेत्रात कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्या नेमणुका करणे-**

राज्य निवडणूक आयोगाने आदेश क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का-५, दि. १६ जुलै,२०२५ अन्वये या संदर्भात सविस्तर आदेश काढलेले आहेत. त्यानुसार सद्याच्या पदावर तीन वर्ष पूर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना निवडणूक कार्यक्षेत्रात नेमणूक देता येणार नाही. तसेच ज्यांचे स्वग्राम अथवा सेवा पुस्तकातील रहिवाशी पत्ता निवडणुका असलेल्या क्षेत्रातील असल्यास त्यांना तेथे नियुक्त करता येणार नाही. यामध्ये पोलीस ठाण्याचे प्रभारी (SHO), उप विभागीय पोलीस अधिकारी (SDPO) व

अतिरिक्त पोलीस अधीक्षक (Addl. SP) यांचा समावेश आहे. नेमणुका करताना प्रामाणिकपणा आणि निष्पक्षता या बाबींचा विचार करावा.

निवडणुकीदरम्यान जर एखादा अधिकारी पक्षःपातीपणे वागत असल्याचे आढळले तर राज्य निवडणूक आयोगाच्या मंजुरीनंतर त्याची बदली करता येईल. जर प्रशासकीय कारणास्तव सदर अधिकाऱ्याची बदली करणे शक्य नसल्यास त्या अधिकाऱ्यास निवडणुकीशी संबंधित बंदोबस्तावर न नेमता कार्यालयीन कामकाज देण्याबाबत कार्यवाही करावी.

२. कायदा व सुव्यवस्था राखणे-

राज्य पोलीस दल हे पोलीस महासंचालक (DGP) यांच्या सर्वसाधारण नियंत्रणाखाली असतात; संबंधित पोलीस आयुक्त (CP), जिल्हा पोलिस अधिक्षक (SP) हे त्यांच्या कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्थेसाठी जवाबदार असतील. याबाबत त्यांचे अधिपत्याखालील अधिकारी व कर्मचारी यांचेवर नियंत्रण ठेवणे, त्यांना आवश्यक ते निर्देश देणे, त्यांना दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करणे इत्यादी बाबी महत्वाच्या आहेत. पोलीस दलाने आपल्याकडे उपलब्ध व आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची निश्चिती करुन आवश्यक त्या ठिकाणी गृहरक्षक दल (Home Guards), गावसुरक्षा दल (Village Defence Force), राज्य राखीव दल (SRPF) यांची मदत घ्यावी.

संबंधित पोलीस आयुक्त, संबंधित जिल्हा पोलिस अधिक्षक यांनी त्यांच्या क्षेत्रातील गंभीर गुन्हे, किरकोळ गुन्हे, जातीय दंगली, जमावबंदी विषयक गुन्हे, निवडणुकीशी संबंधित गुन्हे इत्यादी बाबी विचारात घेऊन तयार केलेल्या कृती आराखड्याच्या अंमलबजावणीसाठी पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी.:-

(i) जिल्हा दंडाधिकारी व पोलीस अधिक्षक यांचे संयुक्त दौरे:

मतदानपूर्व कालावधीमध्ये जिल्ह्यातील संवेदनशील भागांचा जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक (SP) यांनी एकत्रित दौरा करून सर्व संबंधित घटक, राजकीय पक्ष, समाजातील निष्कलंक व

प्रतिष्ठीत व्यक्ती इत्यादींसमवेत बैठक घेऊन कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घ्यावा.

**(ii) उप विभागीय अधिकारी (SDM) / उप विभागीय पोलीस अधिकारी (SDPO) यांचे संयुक्त दौरे:**

SDM आणि SDPO यांनी आपल्या क्षेत्रातील (शहर व गाव) संवेदनशील मतदान केंद्र असलेल्या परिसरांना भेट द्यावी व परिस्थितीचे आकलन करुन आवश्यक उपाययोजना करण्यात व मतदारांचा विश्वास वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.

**(iii) पोलीस ठाण्याचे प्रभारी (SHO) ची सर्व मतदान केंद्रांना भेट:**

SHO ने आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व मतदान केंद्रांना व गावांना भेट द्यावी. या भेटीचा उद्देश मतदारांचा आत्मविश्वास वाढवणे, खोट्या मतदानाविरोधात जनजागृती करणे, त्रासदायक व्यक्तींची ओळख पटविणे आणि परवाना असलेल्या शस्त्रांची यादी अद्ययावत करणे हा आहे. गावातील जातीय, धार्मिक व राजकीय तणावांची माहिती घेऊन योग्य प्रतिबंधक कारवाई करावी. यापूर्वीच्या कोणत्याही निवडणुकीतील कायदा व सुव्यवस्था बिघडलेल्या संवेदनशील मतदान केंद्र व सभोवतालचा परिसर यावर लक्ष ठेवण्याबाबत विशेष काळजी घेण्यात यावी.

**(iv) गुप्तचर माहिती संकलन:**

निवडणूक कार्यक्षेत्रात प्रचारासाठी किंवा तत्सम कामासाठी कार्यक्षेत्राबाहेरील नवख्या व अनोळखी व्यक्तींबाबत माहिती घेणे, त्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवणे यासोबतच सदर कार्यक्षेत्रात गैरकायदेशीर शस्त्रे, दारू, स्फोटके याबाबत माहिती घेऊन त्यावर त्वरीत आवश्यक कार्यवाही करावी.

(v) आवश्यक मनुष्यबळाची संख्या:

उपरोक्त सर्व कार्यवाही अंती अतिरिक्त दल, शस्त्रे, संवाद साधने, बजेट आणि वाहने यांची गरज ओळखून सुरक्षा व्यवस्थेचा अहवाल तयार करावा. यामध्ये मतदान केंद्रावर येणाऱ्या पडदानशीन महिलांची तपासणी/खात्री करण्यासाठी पुरेशा प्रमाणात महिला पोलीस किंवा महिला होमगार्ड असल्याबाबत खात्री करावी..

(vi) अनुकूल वातावरण निर्मिती:

शांततेत निवडणुका पार पडाव्यात यासाठी वातावरण अनुकूल ठेवणे आवश्यक आहे. फ्लॅग मार्च, प्रसार माध्यमद्वारे कायदा अंमलबजावणीच्या तयारीची माहिती, गुंडांना आवर घालण्यासाठी खुले सराव शिबिरे आयोजित करणे इत्यादी उपक्रम राबवावेत.

३. प्रतिबंधात्मक उपाययोजना-

निवडणुकांदरम्यान सुरुवातीपासूनच पोलीस विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग व इतर संबंधित विभागांनी सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना सुरु कराव्यात :-

i) निर्भय, मुक्त व पारदर्शकरितीने निवडणुका घेण्यामध्ये अडथळा येऊ शकेल अशा व्यक्तींची उदा. सराईत गुन्हेगार, गुंड प्रवृत्तीचे व्यक्ती, फरार घोषित करण्यात आलेले व परागंदा गुन्हेगार, संशयित व्यक्ती, जामीनावर सुटका केलेले अथवा पॅरोलवर असलेले व तत्सम इत्यादीची यादी तयार करुन त्यांच्यावर भारतीय न्याय संहिता, २०२३ अन्वये आवश्यक कारवाई करण्यात यावी. यामध्ये प्रतिबंधात्मक कारवाई करणे, पॅरोल व जामीनावर सुटलेल्या व्यक्ती जामीनाच्या अटी, शर्तीचे पालन करतात काय यावर लक्ष ठेवणे, चांगल्या वर्तणुकीसाठी बंधपत्र लिहून घेणे, आवश्यक कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यांना तडीपार करणे, इ. प्रकारच्या कारवाईचा समावेश असू शकेल.

ii) विविध न्यायालयांनी व प्राधिकरणांनी जारी केलेले वॉरंट/समन्स बजावून कायद्यातील तरतुदीप्रमाणे पुढील कार्यवाही करणे.

iii) मुंबई दारुबंदी अधिनियम, १९४९ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार विनापरवाना किंवा अवैधरित्या दारु तयार करणारे यासोबतच विनापरवाना विक्री करणाऱ्यांवर धाडी घालणे, मतदानाच्या आदल्या दिवशी, मतदानाच्या दिवशी व मतमोजणीच्या दिवशी अवैध दारु विक्री होणार नाही याकरीता योग्य त्या उपाययोजना करणे, सदर अधिनियमांतर्गत दाखल असलेल्या व निकाली न निघालेल्या सर्व प्रकारच्या प्रकरणांचा पाठपुरावा करणे, त्यामधील अपचारी यांना कायद्यातील तरतुदीनुसार शिक्षा होण्यासाठी पाठपुरावा करणे इ.

iv) यापूर्वी झालेल्या निवडणुकीत, दाखल झालेल्या प्रलंबित निवडणूक संबंधी गुन्ह्यांचा/दाव्यांचा पाठपुरावा करणे, इत्यादी.

v) निवडणुका जाहीर झाल्यापासून शस्त्रास्त्रे बाळगण्यास बंदी राहील. ही बंदी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत शस्त्र अधिनियम,१९५९ अन्वये आवश्यक त्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन अंमलात आणावी. बेकायदेशीर शस्त्रे, दारु, स्फोटके बाळगणाऱ्या गुंडांविरुध्द विशेष मोहिम राबवावी.

४. आर्थिक बळाचा दुरूपयोग टाळणे-

आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणे, आर्थिक बळाचा दुरुपयोग टाळणे व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश ठेवण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात.

i) मतदारांवर प्रभाव टाकण्याकरीता देण्यात येणाऱ्या वस्तू, मद्य (Liquor), पैसा इत्यादींच्या वाटपावर लक्ष ठेवण्यासाठी विमानतळ, रेल्वे, परिवहन, राज्य उत्पादन शुल्क, वन, नेव्ही, कोस्टगार्ड इत्यादी विभागांशी समन्वय साधून विमानतळ, रेल्वेस्थानक, हॉटेल्स, फार्महाऊस, रिसॉर्ट याठिकाणी होणाऱ्या पैशाच्या, मद्याच्या अवैध मार्गाने होणाऱ्या वाहतुकीवर व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवावे.

ii) रोख रकमांच्या मोठ्या व्यवहारावर सर्व संबंधित ठिकाणी उदा. बँक, पतपेढ्या इत्यादी ठिकाणी संबंधित अधिकाऱ्यांशी समन्वय साधून लक्ष ठेवणे.

iii) सर्व व्यवहार व हालचालीवर जसे तारण, वित्तीय हवाला दलाल (Pawn Brokers, Financial Brokers, Hawala Agents) लक्ष ठेवणे.

५. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करावयाच्या आवश्यक उपाययोजना-

(i) व्हिडीओग्राफी सर्व्हेलियन्स पथक (Video Surveillance Team)-

आचारसंहिता कालावधीमध्ये निवडणुकीच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या महत्वाच्या घटना, मिरवणुका, प्रचार फेऱ्या, सभा अथवा आचारसंहितेच्यादृष्टीने महत्वाच्या घटनांचे व्हिडिओ चित्रीकरण करण्यात यावे.

अवाजवी खर्चाबाबत किंवा आचारसंहितेचा भंग होणाऱ्या घटनांबाबत या पथकाने निवडणूक निर्णय अधिकारी यांना त्वरित विनाविलंब माहिती उपलब्ध करुन द्यावी. एखादया प्रकरणी व्हिडिओग्राफी सर्व्हेलियन्स पथक (Video Surveillance Team) उपलब्ध होवू न शकल्यास अधिकारी / कर्मचारी यांनी मोबाईलवर अशा प्रकरणांचे चित्रीकरण करुन निवडणूक निर्णय अधिकारी यांना संबंधित क्लीपसह अहवाल सादर करावा. या क्लीप तपासणीसाठी Video Viewing Team ठेवावी.

(ii) भरारी पथक (Flying Squad) :-

पैशाची व मद्याची अवैध मार्गाने वाहतूक, मतदारांना प्रलोभन ठरतील अशा व अन्य संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी भरारी पथक (Flying Squad) तैनात करण्यात यावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन आवश्यक त्या वस्तू जप्त कराव्यात व पुढील कायदेशीर कारवाई करावी.

(iii) चेक पोस्टसाठी पथक (Static Surveillance Team):-

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील महत्वाचे नाके, इत्यादी जेथून मद्य / पैशाची अवैध वाहतूक तसेच मतदारांना प्रलोभन ठरतील अशा वस्तूंची / पैशांची वाहतूक होऊ शकते, अशा ठिकाणी चेक पोस्ट तयार करुन वरील पथक नेमावे. या पथकाने योग्य ती तपासणी करुन बेकायदेशीर वस्तू जप्त करुन पुढील कायदेशीर कारवाई करावी. या सर्व गोष्टींचे व्हिडीओ चित्रीकरण करण्यात यावे.

(iv) तक्रार निवारण कक्ष :-

आचारसंहिता भंगाची तक्रार स्विकारण्यासाठी व त्यावर तातडीने कार्यवाही करण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे जिल्हास्तर किंवा स्थानिक स्वराज्य संस्थानिहाय कंट्रोल रुम/ कॉल सेंटरची स्थापना करण्यात यावी. या कंट्रोल रुममध्ये उपलब्ध असलेले दूरध्वनी / मोबाईल क्रमांक यांना योग्य ती प्रसिध्दी द्यावी.

(iv) वरील तिन्ही पथके व तक्रार निवारण कक्षासाठी महानगरपालिका आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी पोलिस आयुक्त / पोलीस अधिक्षक यांच्याशी सल्लामसलत करुन योग्य अधिकारी / कर्मचारी यांची नियुक्ती करावी. उदा. महानगरपालिकेचे सक्षम अधिकारी, नायब तहसिलदार, पोलीस उप निरीक्षक, व्हिडिओग्राफर व शस्त्रधारी पोलिस, इत्यादी तसेच त्यांना त्यांचे काम व्यवस्थित रितीने करता यावे यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था (वाहनासह) उपलब्ध करुन द्यावी.

६. आदर्श आचारसंहितेचे पालन-

राज्य निवडणूक आयोगाने आचारसंहितेच्या अनुषंगाने क्र. रानिआ / जिपपंस-२०२५ / प्र.क्र.४२ / का-७, दि. ०४ नोव्हेंबर,२०२५ अन्वये सविस्तर आदेश दिलेले आहेत. जिल्हाधिकारी आणि पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात व महानगरपालिका आयुक्त आणि पोलीस आयुक्त यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात आचारसंहितेचे पालन सुनिश्चित करावे. मतदारांना प्रलोभन देणे, समाजाच्या विविध घटकांमध्ये तणाव निर्माण करणे, वाहनांचा गैरवापर, दारू विक्री, मालमत्तेचे विद्रुपीकरण,

ध्वनीवर्धकांचा वापर, सार्वजनिक सभा व प्रचार यावर नियंत्रण ठेवावे. नामनिर्देशनपत्र भरताना कायद्याचे व आदर्श आचारसंहितेचा भंग होऊ नये म्हणून पुरेसा बंदोबस्त करावा.

७. प्रसार माध्यमांचा गैरवापर टाळणे तसेच निवडणूक जाहिराती प्रमाणन-

राज्य निवडणूक आयोगाने क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का-१०, दि. ०९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये निवडणुकांच्या प्रयोजनार्थ प्रसार माध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५ लागू केले आहेत. त्यानुसार उमेदवारांनी, पक्षांनी, पत्रकारांनी तसेच प्रसारमाध्यमांनी पाळावयाच्या नियमावलीबाबत त्यांना माहिती द्यावी.

८. निवडणूक निरीक्षक-

निवडणूक प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडून निवडणूक निरीक्षक नेमण्यात येणार आहेत. निर्भय, मुक्त व पारदर्शक निवडणूकांसाठी आवश्यक त्या सर्व व्यवस्था बरोबर, आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी, खर्चावर नियंत्रण, आर्थिक बळाचा दुरुपयोग व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या वस्तूंच्या वाटपावर अंकुश, इत्यादी कामांवर त्यांनी लक्ष ठेवावयाचे आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

०४.११.२०२५

( सुरेश काकाणी )
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

प्रति,
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय मुंबई
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य
संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय

सर्व विभागीय आयुक्त
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व पोलीस आयुक्त
सर्व पोलीस अधिक्षक
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व मुख्य/ अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व मुख्याधिकारी, नगर परिषदा/ नगर पंचायती
राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
निवड नस्ती